# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{प्रकल्प विभाग}**

भारतीय खाद्य संरक्षा एंव मानक प्राधिकरण, स्वास्थ एंव परिवार कल्याण मंत्रालय, भारत सरकार, यांनी नागपूर शहरात अत्याधुनिक क्लिन स्ट्रिट फुड हब विकसित करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेला रुपये 1.00 कोटीचे अनुदान प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्पाकरीता प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती झालेली असुन मे. ग्रिन अर्थ स्टुडियो, नागपूर (प्रकल्प सल्लागार) यांनी सदर कामाकरीता नरेंद्रनगर फ्लॉय ओव्हरकडे जाणाऱ्या रस्त्या लगतची महानगरपालिकेची मौजा – सोमलवाडा नगर भुमापन क्रमांक ६१५ ही जागा क्लिन स्ट्रिट फुड हबच्या विकासाकरीता निश्चित करण्यात आलेली असुन यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक १८/१०/२०२३ ला मंजुरी दिलेली आहे.

मे. ग्रिन अर्थ स्टुडियो, नागपूर (प्रकल्प सल्लागार) यांनी सदर कामाचे रुपये ३,८०,५०,१६९/- चे प्राकलन तयार केले असुन यापैकी केंद्र शासनाच्या अनुदानापोटी रुपये १.०० कोटी प्राप्त झालेले असुन उर्वरित निधी २,८०,५०,१६९/- म.न.पा. चे नाविन्यपुर्ण पद क्रमांक A २८९०१३४१००२ मधुन मंजुर करण्याकरीताचा प्रश्न विचारात घेणे.

टिप – सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 28/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 11/01/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार भारतीय खाद्य संरक्षा एंव मानक प्राधिकरण, स्वास्थ एंव परिवार कल्याण मंत्रालय, भारत सरकार, यांनी नागपूर शहरात अत्याधुनिक क्लिन स्ट्रिट फुड हब विकसित करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेला रुपये 1.00 कोटीचे अनुदान प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्पाकरीता प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती झालेली असुन मे. ग्रिन अर्थ स्टुडियो, नागपूर (प्रकल्प सल्लागार) यांनी सदर कामाकरीता नरेंद्रनगर फ्लॉय ओव्हरकडे जाणाऱ्या रस्त्या लगतची महानगरपालिकेची मौजा – सोमलवाडा नगर भुमापन क्रमांक ६१५ ही जागा क्लिन स्ट्रिट फुड हबच्या विकासाकरीता निश्चित करण्यात आलेली असुन यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक १८/१०/२०२३ ला मंजुरी दिलेली आहे.

मे. ग्रिन अर्थ स्टुडियो, नागपूर (प्रकल्प सल्लागार) यांनी सदर कामाचे रुपये ३,८०,५०,१६९/- चे प्राकलन तयार केले असुन यापैकी केंद्र शासनाच्या अनुदानापोटी रुपये १.०० कोटी प्राप्त झालेले असुन उर्वरित निधी २,८०,५०,१६९/- म.न.पा. चे नाविन्यपुर्ण पद क्रमांक A २८९०१३४१००२ मधुन मंजुर करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.